जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2024
सकाळ

# विद्यापीठातील शरण साहित्य, लोकस्मृती वसतिगृहाला देणगी

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी शरण साहित्य अध्यासनासाठी २१ हजार रुपयांची देणगी प्रदान केली.

या अध्यासनासाठी लोकवर्गणीतून निधी संकलन केले जात आहे. महात्मा बसवेश्वर आणि त्यांच्या सहकारी शरण-शरणींनी निर्माण केलेल्या साहित्याचे अध्ययन, अध्यापन, संशोधन आणि प्रकाशन यासाठी निधी वापरण्याचे नियोजन आहे. डॉ. करेकट्टी यांनी देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी यश आंबोळे उपस्थित होते.

दरम्यान, विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५१ हजार १११ रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. प्राणिशास्त्र व रेशीम शास्त्र अधिविभागाच्या सन १९९७-९९ बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन विद्यापीठात लोकवर्गणीतून साकारण्यात येत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहास बळ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज या बॅचने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निधीचा धनादेश सुपूर्द केला. 'आम्ही आमच्या बॅचच्या वतीने हा निधी कृतज्ञतापूर्वक विद्यापीठास देत असून त्यामध्ये कोणाचेही वैयक्तिक नाव न येता बॅचच्याच नावे हा निधी वापरावा', अशी विनंती त्यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 MAR 2024

पुण्यनगरी

# आधुनिक तंत्रज्ञानाने स्वत:ला सिद्ध करा : डॉ. विलास शिंदे

**कागल : प्रतिनिधी**

वाचा, वेचा, साठवा, सहज आणि सुंदरतेने उपयोग करा. केवळ परीक्षार्थी न राहता, मानवी शाश्वत जीवनमूल्ये वेचता व टिकवता आली पाहिजेत. यासाठी बदलत्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाने स्वत:ला सिद्ध करा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

येथील डी. आर. माने महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. विविध खेळ, कला, क्रीडा, एन. एस.एस., एन.सी.सी., शैक्षणिक क्षेत्रामध्ये विशेष प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कॅम्पस डायरेक्टर प्राचार्य डॉ. प्रवीण चौगले यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्या डॉ. नीला जोशी यांनी केले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. हसिना मालदार, 'नॅक' समन्वयक डॉ. आदिनाथ गाडे, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. अमरसिंग रजपूत उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सरस्वती गायकवाड, प्रा. संदीप वाडीकर यांनी केले.

26 MAR 2024

सकाळ

# विद्यापीठात व्यवसाय विकास कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटतर्फे व्यवसाय विकास कार्यशाळा २१ आणि २२ मार्च रोजी घेण्यात आली. त्यात गोवा येथील अर्थ बिझनेस कन्सलटन्सीच्या ऋतुजा साबणे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी अधिष्ठाता प्रा. एम. एस. देशमुख, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य विभागाचे संचालक प्रा. एस. डी. डेळेकर यांनी मार्गदर्शन केले. ऋतुजा यांनी उद्योगांची ओळख, उद्योग चालू करण्याचे तंत्र सोप्या भाषेत समजावून सांगितले. नवकल्पनेतून उद्योग सुरु करणे. त्यासाठी कुठून बीज भांडवल, कर्ज पुरवठा मिळू शकेल, याबद्दल मार्गदर्शन केले. वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. यावेळी अधिसभा सदस्य विष्णू खाडे, डॉ. पी. डी. राऊत, शिवानंद पाटणे उपस्थित होते.